ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 9 | MAY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतीय स्त्री जीवन :एक ऐतिहासिक आढावा



**डॉ. प्रतिभा रंगराव बिरादार**
**समाजशास्त्र विभाग, माऊली महाविद्यालय वडाळा .**

## प्रस्तावना-

भारतीय समाजाच्या इतिहासात स्त्रियांचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण स्वरूपाचे मानले जाते. कोणत्याही समाजाचा किंवा देशाचा विकास हा स्त्री व पुरुषांच्या समान विकासावर अवलंबून असतो . भारतीय संस्कृती ही सर्वश्रेष्ठ संस्कृती असून जगाच्या दृष्टीने आदर्श संस्कृती मानली जाते .भारतीय संस्कृतीला विशिष्ट परंपरा व संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. जगातील सर्वच देशाच्या संस्कृतीचा इतिहास पाहिला असता सर्वच समाजात लिंगभेदावर आधारित विषमतेची रचना आहे याला भारत देश ही अपवाद कसा राहणार? भारतीय संस्कृती ही मातृसत्ता कुटुंब व्यवस्थेची पाईक मानली जाते. परंतु समाज परिवर्तनाबरोबरच पुरुषप्रधान संस्कृतीचा विस्तार आणि विकास झाला. संपत्तीचा वारसदार आणि वंशाचा दिवा म्हणून मुलाला महत्त्व प्राप्त झाले.यशाची उंच भरारी घेऊन आज स्त्रियांनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे. चूल आणि मूल एवढेच मर्यादित कार्यक्षेत्र असलेली स्त्री आज गावापासून ते दिल्लीपर्यंतच नेतृत्व करताना दिसते. आज स्त्रियांचा दर्जा हा परिवर्तित झाला आहे. प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया आपल्या बुद्धीची चुणूक दाखवून आपला ठसा उमटविताना दिसते. तिचे आजचे यश पाहता त्या यशाच्या पाठीमागचा इतिहास पाहणे महत्त्वाचे आहे. भारतीय स्त्री जीवनाचा ऐतिहासिक आढावा पाहिल्याशिवाय स्त्रियांचा बदललेला दर्जा समजणार नाही. त्यासाठी विविध कालखंडातील स्त्री जीवनाचा आढावा या संशोधन पेपर मध्ये घेण्यात आला आहे.

- **संशोधनाचा उद्देश-**

१. साहित्याचा आढावा घेणे.
2. विविध कालखंडातील स्त्री जीवनाचा आढावा घेणे.
3. मिळालेल्या तथ्याच्या आधारे निष्कर्ष मांडणे.

- **तथ्य संकलन-**

संशोधन पेपर तयार करताना दुय्यम तथ्य संकलनाचा आधार घेण्यात आला.

- **गृहीत कृत्य-**

संशोधन पेपर तयार करताना पुढील गृहीतकृत्य मांडण्यात आले.
१.भारतीय स्त्रियांचा दर्जा तुलनात्मक दृष्ट्या पुरुषापेक्षा कमी आहे.
२. भारतीय स्त्री विषयक कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नाही.
3. प्राचीन कालखंडापेक्षा आधुनिक कालखंडात स्त्रियांचा दर्जा उंचावला आहे. परंतु स्त्रियांच्या समस्या वाढल्या आहे.

- **स्त्री जीवनाचा ऐतिहासिक आढावा-**

सुरुवातीला भटक्या स्वरूपात जीवन जगणारा मानव हा गरजांच्या पूर्ततेसाठी समूहाने राहू लागला. मानवी उत्क्रांतीच्या सुरुवातीच्या काळात समाज रचना व कुटुंब संस्था अस्तित्वात नव्हती. स्त्रिया आणि मुले हे समूहातून फिरत असे गर्भधारणा आणि मुलाचा संगोपन यामुळे स्त्रियांना एकाच ठिकाणी जास्त काळ राहावे लागत.गवताचे बी जमिनीत पडून त्या अंकुर पावतात हे स्त्रियांच्या लक्षात आले व त्यातून शेतीचा शोध लागला. सुरुवातीच्या काळात स्त्रियांना शेतीचे ज्ञान ,निर्णय स्वातंत्र्य व त्यांना पवित्र स्थान समाजाने दिले होते. स्त्री आणि पुरुषांचा विचार केला तर पारंपारिक समाजापासून आजपर्यंत स्त्रियांचा दर्जा प्रत्येक कालखंडात म्हणजे इतिहासात एक सारखा आहे असे नाही तर वेगवेगळ्या कालखंडात स्त्रियांचा दर्जा काळानुसार बदलत गेला. म्हणजे विविध कालखंडात भारतीय स्त्रियांचा दर्जा कसा होता त्यामध्ये कशा पद्धतीने बदल होत गेला. यासंबंधीचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे

**१. प्राचीन कालखंड:-**

**अ.सिंधू संस्कृतीतील भारतीय स्त्री जीवन-**

भारतातील सर्वात प्राचीन संस्कृती म्हणजे सिंधू संस्कृती होय. हडप्पा आणि मोहंजोदडो सारखे मोठे आणि प्रगत शहरे अस्तित्वात होती.सिंधू संस्कृती ही एक नागरी संस्कृती होती. सिंधू संस्कृतीत महिलांना विशेष सन्मान होता. म्हणजे महिलांची स्थिती सन्मान जनक होती. कारण सिंधू संस्कृतीत उत्खननात सापडलेल्या स्त्रियांच्या मुर्त्यावरून आणि मातृदेवीच्या प्रसिद्धी वरून इतिहासकार असे अनुमान लावतात की सिंधू संस्कृतीमध्ये मातृसत्ता कुटुंब पद्धती होती. कुटुंबप्रमुख म्हणून स्त्रियांना महत्त्वाचे स्थान होते. तसेच सिंधू संस्कृतीतील देवता स्त्रीप्रधान होत्या. दैनंदिन व्यवहारात स्त्रीचे स्थान मध्यवर्ती होते. कारण त्या कुटुंब प्रमुख होत्या तसेच मोहनजोदडो व हडप्पा येथे सापडलेल्या असंख्य मुर्त्यावरून त्या कालखंडात स्त्रियांना मानाचे स्थान होते. असे इतिहासकारांनी मत मांडले आहे त्यावरून सामाजिक आणि धार्मिक सण समारंभामध्ये स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने भाग घेत असत. स्त्रीला कुटुंबात मानाचे स्थान होते. या कालखंडात मानाने व सन्मानाने जगणाऱ्या भारतीय स्त्रियांचा दर्जा हा चांगला होता. प्राचीन कालखंडामध्ये वैदिक आणि उत्तर वैदिक काळाचा हे समावेश होतो.

**ब.वैदिक कालखंडातील भारतीय स्त्री जीवन:-**

सिंधू संस्कृतीचा अस्त झाल्यानंतर नव्या संस्कृतीचा उदय झाला वैदिक किंवा आर्य संस्कृती असेही म्हणतात. या कालखंडात स्त्रियांना शिक्षण संपत्ती इत्यादी बाबतीत पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते. म्हणजेच वैदिक काळातील स्त्री जीवन मानाचे व उच्च दर्जाचे होते. आर्यन स्त्रियांची स्तुती केली होती म्हणजेच कोणत्याही देवाला स्त्रीत्व शिवाय पूर्णत्व येत नाही असे मानले गेले होते. या कालखंडातील समाज पुरुषप्रधान होता. पण स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते. स्त्रियांना स्वतःचा विकास करण्यासाठी शिक्षण ,विवाह, संपत्ती ,वारसा इत्यादी बाबत चांगले अधिकार होते. म्हणजेच समाजाने या कालखंडात पुरुषाप्रमाणे स्त्रियांना दर्जा दिला होता. स्त्रियांना मान-सन्मान होता. पुरुषाप्रमाणे त्यांना स्वतंत्र बौद्धिक जीवन होते. या कालखंडात स्त्रियांना सर्व प्रकारचे अधिकार मिळाले होते. अभ्यासकांच्या मते वैदिक कालखंड हा स्त्रियांच्या विकासाच्या दृष्टीने सुवर्णयोग मानल्या जातो. या कालखंडात स्त्रियांचा दर्जा उच्च व समानतेचा होता सर्व प्रकारचे अधिकार स्त्रियांना या काळात मिळालेले होते.

**क.उत्तर वैदिक कालखंड:-**

उत्तर वैदिक कालखंडाच्या सुरुवातीला आर्याचे भारतातील जीवन स्थिर झाले होते. तीर्थलक्ष्मणशास्त्र जोशी म्हणतात, 'ऋग्वेद काळातच भारतात पितृसत्ताक व्यवस्था पूर्णपणे निर्माण झाली. या काळात आर्यांने सोबत आणलेली पितृसत्ता पद्धत व अनाऱ्याची स्त्रीप्रधान कुटुंब पद्धती यामुळे स्त्रियांना सुरुवातीला स्वातंत्र्य व समान अधिकार असले पाहिजे. कारण उत्तर वेदिक काळात स्त्रियांची स्थिती खालावली आर्यांनी आपली सत्ता विस्तारित केली स्त्रियांच्या दर्जेच्या बाबतीत हा काळ संक्रमणाचा काळ ठरला कारण स्त्रियांच्या दुय्यमत्वाला धर्माची जोड देण्यासाठी अनेक धर्मग्रंथांची निर्मिती याच कालखंडात करण्यात आली. रुढी, प्रथा, परंपरा या बंधनात बांधून स्त्रीला तिच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले. मनुस्मृती सारख्या ग्रंथांची रचना झाली व स्त्रियांच्या दर्जाला घसरण लागली. 'पिता रक्षते कोमारे; भरत रक्षते यौवणे,पुत्ररक्षते वार्धक्य न स्त्रीस्वातंत्र्य' असे विचार रूढ झाले .शूद्र आणि सर्व वर्णनातील स्त्रियांचा दर्जा समान समजला गेला.

**२. मध्ययुगीन कालखंड:-**

साधारणपणे 1200 ते 1800 पर्यंतचा कालावधी हा मध्ययुगीन कालखंडाचा मानला जातो. अकराव्या शतकाच्या सुरुवातीपासून भारतावर मुस्लिम राजवट होती. भारतीय स्त्री जीवनातला अत्यंत अंधकारमय कालखंड हा मध्ययुगीन कालखंड मानला जातो .स्मृती काळापासून स्त्रियांच्या दर्जेला उतरती कळा लागली होती. स्त्रियांचा दर्जा या काळात खूप घसरला गेला शिक्षणापासून तिला वंचित ठेवण्यात आले. सामाजिक ,धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय सर्व प्रकारचे हक्क व अधिकार नाकारण्यात आले. बालविवाह, सती प्रथा, जरट कुमारी विवाह, पडदा पद्धती अशा अनेक वाईट प्रथांना स्त्रियांना सामोरे जावे लागले. काही बोटावर मोजणे इतपत पराक्रमी स्त्रिया ही या काळात होऊन गेल्या.

**३. ब्रिटिश कालखंड:-**

एकोणिसाव्य शतक हे खऱ्या अर्थाने आधुनिकतेचे पहाट घेऊन उगविले, स्त्री विकासाच्या दृष्टीने एक असेचा किरण घेऊन आलेला हा कालखंड संत गतीने का होईना स्त्री सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला वाईट रुढी प्रथा परंपरा याला छेद देण्यासाठी विविध कायद्यात्मक तरतुदी करण्यात आल्या. स्त्री शिक्षणासाठी फुले दांपत्याने पहिले पाऊल उचलले एखाद्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवरून त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल संसदेत मांडले. स्त्री विकासासाठी स्त्रिया संघटित होऊन महिला संघटना अस्तित्वात आल्या चूल आणि मूल या कार्यक्षेत्रात बंदिस्त केलेल्या स्त्रिया ह्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनात सहभाग घेऊ लागल्या. स्वतंत्र चळवळीमध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी कार्य केलेले दिसून येते.

**४. स्वातंत्र्योत्तर कालखंड:-**

स्त्रियांचा दर्जा सुधारण्यास स्वातंत्र्योत्तर कालखंडात वेग प्राप्त झाला. विविध सुधारणात्मक कायदे व घटनात्मक तरतुदी यामुळे स्त्री विकासाला वेग मिळाला. कल्याणकारी कायदे आणि विविध महिला संदर्भातील शासकीय योजना यामुळे स्त्रिया पुढे येऊ लागल्या. शिक्षणाच्या प्रसारातून हक्क व अधिकारा संदर्भात स्त्रिया लढू लागल्या. गुणवत्ता असेल तर पुरुषांच्या बरोबरीने आपण कर्तबगार आहे हे सिद्ध करण्यास मुक्त परवानगी मिळाली. स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन वाढत असून स्त्रीला तिच्या इच्छा आकांक्षा प्रमाणे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवण्याचा व जगण्याची संधी प्राप्त झाली आहे.

**५. वर्तमान काळातील स्त्रियांचा दर्जा:-**

वर्तमान काळात स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने दर्जा प्राप्त केलेला दिसून येत असला तरी अशा स्त्रियांचे प्रमाण हे प्रत्यक्षात अल्प आहे स्त्री शिक्षणाचे प्रमाण आजही 71.5% आहे. स्थानिक स्वराज्य संस्थे 33% आरक्षण प्राप्त झाले असले तरी प्रत्यक्षात त्याचा उपभोग घेणाऱ्या किंवा नेतृत्व करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण हे अल्प आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत विचार केला तर असे दिसून येते की काही मोजका कालावधी सोडला तर सर्वच काळात भारतीय स्त्रियांचे स्थान हे दुय्यम असलेले दिसून येते प्रत्येक काळात जनक क्षमता, लैंगिकतेवर, श्रमावर पुरुषांचे वर्चस्व हे असलेले दिसून येते. स्त्री पुरुष समान मांनणाऱ्या देशांमध्ये आजही मोठ्या प्रमाणात लिंगभेदावर आधारित विषमता दिसून येते. देशाची अर्धे शक्ती असलेली स्त्री आजही दुर्बल आणि वंचित घटकांमध्ये मोडते हे सत्य नाकारता येत नाही स्वातंत्र्यपूर्व काळापेक्षा स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये स्त्रियांचा दर्जा सुधारित झाला असे चित्र दिसत असले तरी त्यांच्या पुढील समस्या संकटे आणि आव्हाने मोठ्या प्रमाणात वाढले आहे. वर्तमान काळातील स्त्रियांच्या स्थितीतील उज्वल बाजूप्रमाणे त्यांची दुसरी बाजू तितकीच अंधकारमय आहे. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री शिक्षणाच्या चळवळीने व स्त्रीमुक्तीच्या चळवळीने स्त्रियांचे स्थान निश्चित बदलत चालले आहे. स्त्री ही पुरुषांच्या बरोबरीने काम करताना दिसत आहे. म्हणून स्त्रियांच्या समस्या पूर्णपणे सुटल्या आहेत असे म्हणता येणार नाही. या उलट समाजामध्ये काही क्षेत्रे अशी आहेत व कौटुंबिक जीवनातील असे काही टप्पे आहेत की ज्यातून स्वातंत्र्यपूर्वकालीन परिस्थितीपेक्षाही जास्त भयावह अशी दृश्य समोर येतात. हिंसा व अत्याचार यांच्या नित्य घटना प्रत्यास येतात. व या घटना स्वातंत्र्यानंतरच्या अनेक वर्षाच्या कालखंडातील स्त्री उद्धाराच्या अनेक उपक्रमांना व प्रयत्नांना कलंकित करणाऱ्या आहेत. भारत सरकारने स्त्रियांच्या स्थितीची पाहणी करण्यासाठी एक महिला आयोगाची स्थापना केली या आयोगाच्या पाहणीतून भारतीय

स्त्री जीवनाचे जे चित्र पुढे आले अत्यंत विदारक आहे हुंडाबळी, बलात्कार ,अत्याचार हे नित्याचेच होऊन बसले आहे. मानहानी , अवहेलना व अतोनात कष्ट याने त्यांचे जीवन ओतप्रोत भरले आहे याची शेकडो उदाहरणे या आयोगाने दिले आहेत.

- **निष्कर्ष:-**

संशोधनातून मिळालेल्या तथ्याच्या आधारे निघालेले निष्कर्ष हे पुढील प्रमाणे

1. प्रारंभीचा काळ हा स्त्री विकासाच्या दृष्टीने स्वर्ण युगाचा काळ होता. तसेच स्त्री सन्मानाचा काळ होता.
2. स्मृति काळापासून स्त्रियांच्या दर्जाला उतरतीकळा लागली.
3. मध्ययुगीन कालखंडा हा स्त्रियांच्या दृष्टिकोनातून अंधकारमयुग मानला जातो कारण मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांचा दर्जा खूप खालावला होता.
4. ब्रिटिश कालखंड हा स्त्री विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा कालखंड असून संत गतीने का होईना स्त्री सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न या कालखंडामध्ये करण्यात आला.
5. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुधारणात्मक कायदे व घटनात्मक तरतुदी यांच्या माध्यमातून स्त्री विकासाला वेग मिळाला. कल्याणकारी योजनेच्या माध्यमातून स्त्री पुरुष समानता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.
6. स्त्रियांच्या दर्जेचा ऐतिहासिक आढावा घेतल्यानंतर असे लक्षात येते की काही मोजका कालावधी वगळता सर्वच काळात समाजामध्ये स्त्रियांचा दर्जा हा दुय्यम दिसून येतो
7. स्त्रियांच्या दर्जेत परिवर्तन होत असले तरी वर्तमान काळात विविध स्वरूपाच्या संकटांना अन्याय अत्याचारांना स्त्रियांना सामोरे जावे लागत आहे.
8. आजही समाजामध्ये लिंगभेदावर आधारित विषमता दिसून येते त्याचप्रमाणे आजही समाजाला परंपरेच पालन करणारी स्त्री प्रतिमा अपेक्षित असलेली दिसते.
9. आजही देशातील तरुणी, महिला सुरक्षित असल्याचे दिसून येत नाही. पुरुषाप्रमाणे महिला स्वतंत्र देशांमध्ये स्वतंत्र जगू शकत नाहीत त्यासाठी कडक कायदे करून त्याचे तत्पर अंमलबजावणी होणे गरजेचे आहे, त्यामुळे दिल्लीतील निर्भयासारखे प्रकरण होणार नाही.
10. महिलांच्या हिताच्या दृष्टिकोनातून स्वतंत्र पूर्व व स्वतंत्र नंतर जोरदार प्रयत्न झाल्याचे दिसून येते. यामध्ये शासन स्तरावर वेगवेगळे कायदे केलेले आहेत.परंतु कायद्याचे काम होत नाही. कायद्याबरोबरच समाजाची मानसिकता बदलण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी शाळा महाविद्यालय प्रसार माध्यमे याच्या माध्यमातून प्रयत्न होणे गरजेचे आहे.

- **सारांश:-**

भारतीय समाज व्यवस्थेत स्त्री जीवनाचा कायापालट कसा झाला हे विविध कालखंडातील भारतीय स्त्री जीवना वरून लक्षात येते. म्हणजेच पारंपारिक समाज व्यवस्थेत स्त्रियांचा दर्जा चांगला होता. त्यांना पुरुषाप्रमाणे बहुसंख्य अधिकार मिळत होते. पुढे मध्ययुगीन कालखंडात अनेक जाचक अटी त्यांच्यावर लादल्या गेल्या. त्यातून त्यांना खूप मोठा अयोग्य बाबींना तोंड द्यावे लागले. म्हणूनच हा कालखंड त्यांच्या बाबतीत काळा कालखंड मानला जातो. पुढे ब्रिटिश भारतात आल्यानंतर स्त्री

विषयक प्रश्नांची जाणीव त्यांना झाली. त्यांच्या निष्ठा व अयोग्य बाबतीत सुटका करण्यासाठी त्यांनी खूप कायदे केले पण या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यामुळे स्त्री समस्येमध्ये फारसा बदल झाला नाही. त्यावेळी अनेक समाजसुधारकांनी त्याविषयी आपला आवाज उठविला.नंतर भारत स्वतंत्र झाला व स्त्रियांचची अनेक संकटातून सुटका होण्यासाठी कायद्याची कडक अंमलबजावणी सुरू झाली. त्यामुळे त्यांच्या दर्जेत सुधारणा होऊ लागली. परंतु वर्तमान काळातील भारतीय स्त्री जीवनात बदल झाले हे खरे आहे पण पूर्वीचे असलेले श्रमविभाजन बदलले नाही म्हणजे स्त्री जीवनाचा गाभा आजही जुनाच आहे ते म्हनण चुकीचे ठरणार नाही. म्हणजे स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन फारसा बदललेला नाही. एक सामाजिक विचारवंत मल्लाडी सब्बमहा म्हणतात की, स्त्रियांच्या दृष्टिकोनात बदल झाला आहे काय याचे उत्तर होय आणि नाही असे दोन्ही द्यावे लागेल कारण समानता ही जरी कायद्याने प्रदान केले असली तरी प्रत्यक्षात मात्र असमानताच अमलात आणले जाते. अशा पद्धतीने भारतीय स्त्री जीवनाचा ऐतिहासिक आढावा आपल्याला थोडक्यात स्पष्ट करता येतो.

- **संदर्भ ग्रंथ :-**

१. प्रियंका माथुर-महिला सशक्तिकरण , ज्योती प्रकाशन जयपुर, 2010
2. अंजू शुक्ला-आधुनिक नारी एव महिला सशक्तिकरण अमन प्रकाशन कानपूर 2010
3. अंकुश सुनीता- स्त्री उंबरठ्या बाहेरील जग, वरद पब्लिकेशन्स औरंगाबाद. डिसेंबर 2007.
4. गीता साने भारतीय स्त्री जीवन मोज प्रकाशन गृह मुंबई 2002
5. युसुफ बेनूर स्त्रियांचे संविधानिक हक्क व जागतिक करार कौशल्य प्रकाशन औरंगाबाद 2011
6. प्रदीप आगलावे:- भारतीय समाज संरचना आणि समस्या, साईनाथ प्रकाशन नागपूर ,2011
7. अरुंधती पाटील :-स्त्री आत्मभान ते सबलीकरण, अरुणा प्रकाशन लातूर 2012
8. https://hi.wikipedia.org